## कांद्याला मिळाला २५०० रुपयांचा दर

**सोलापूर :** श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीत सोमवारी कांद्याची आवक झाली. बाजारात एकूण १९२ ट्रक कांद्याची आवक झाली. लिलावात कांद्याला कमाल २५०० रुपये प्रति क्विंटल इतका दर मिळाला. बाजारातील सर्वसाधारण भाव १४०० रुपये प्रति क्विंटल राहिला. कांदा मार्केटमध्ये २ कोटी ६० लाख उलाढाल झाली.


|| द्वितीय पुण्यस्मरण ||

(१९४६- २०२४)

कै. सौ. कस्तुरीबाई नारायणसा बुरबुरे

तू नसल्याची जाणीव आजही
मनाला चटका लावून जाते !
पण तुझ्या आठवणींची ऊब
जगण्याचे बळ देत राहते !!

-: शोकाकूल :-

समस्त
बुरबुरे परिवार, सोलापूर


## आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना 'गोकुळ'कडून ५ लाख

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** थकीत ऊस बिलासाठी विष प्राशन करून आत्महत्या केलेल्या मुस्ती येथील शेतकरी रामचंद्र अप्पाशा कळके यांच्या कुटुंबीयांना गोकूळ शुगर कारखान्याच्या वतीने ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.

मुस्ती येथील शेतकरी रामचंद्र आप्पा शाळके यांनी गोकूळ शुगर कारखान्याला ५० टन ऊस पुरवठा केला होता. या उसाचे बिल थकल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या या शेतकऱ्याने गुरुवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास प्रोक्लिन हे कीटकनाशक प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला होता. त्याला सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. रविवारी तो शुद्धीवर आल्यानंतर गोकूळ शुगरच्या ऊस बिलासाठी आपण आत्महत्येचा मार्ग स्वीकारल्याचे स्वतः सांगितले. त्यानंतर काही तासातच त्याचा मृत्यू झाला.

या प्रकरणानंतर मृताचे नातेवाईक आक्रमक झाले. दक्षिण सोलापूरचे तहसीलदार किरण जमदाडे यांच्या मध्यस्थीनंतर गोकूळ शुगरच्या वतीने सोमवारी रोख पाच लाख रुपयांची आर्थिक मदत मृत रामचंद्र कळके यांच्या कुटुंबीयांना देण्यात आली. त्यानंतर शवविच्छेदन करून मुस्ती येथे त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

या घटनेनंतर प्रांताधिकारी सुमित शिंदे, तहसीलदार किरण जमदाडे आणि गोकूळ शुगर शेतकरी संघर्ष समितीचे नेते ॲड. अमोल पाटील यांनी शासकीय रुग्णालयात जाऊन मृताच्या नातलगांची भेट घेतली. त्यांना आर्थिक मदत देण्यासाठी प्रयत्न केले.

> या घटनेतील रामचंद्र कळके या शेतकऱ्याने गोकूळ शुगरच्या ऊस बिलासाठी आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले. गोकूळ शुगरने त्यांना आर्थिक मदत दिली मात्र आम्ही त्यांच्या कुटुंबीयांना शासकीय मदत मिळण्यासाठी शक्य तितक्या लवकर प्रस्ताव पाठवून मदत मिळवून देऊ.
>
> **किरण जमदाडे,** तहसीलदार, दक्षिण सोलापूर तालुका

> ऊस बिलासाठी शेतकऱ्यांनी कोणतेही चुकीचे पाऊल उचलू नये. आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी आपल्याला शब्द दिल्याप्रमाणे २६ जूनपूर्वी ऊस बिलाची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल. तसे झाले नाही तर २९ जूनपासून पुन्हा बेमुदत ठिय्या आंदोलन करण्याचा निर्धार कायम आहे. कोणत्याही स्थितीत शेतकऱ्यांनी संयम सोडून चुकीचे पाऊल उचलू नये. न्याय हक्कासाठी संघर्ष करीत राहू.
>
> **ॲड. अमोल पाटील,** गोकूळ शुगर शेतकरी संघर्ष समिती

# भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांवर गंडांतर

### उजनीतून पाणी सोडताना चुकीचे नियोजन केल्याचा फटका : स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा आरोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** उजनी धरणातून पाणी सोडताना चुकीचे नियोजन केल्यामुळेच भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांवर गंडांतर आले आहे. आता वीजपुरवठा बंद करून अन्याय केला जात आहे, असा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे यांनी केला आहे.

यंदा उजनी धरणातून भीमा आणि सीना नदीत पाणी सोडण्याचे नियोजन पूर्णपणे चुकले आहे. पाणी सोडण्याच्या वेळा अत्यंत चुकीच्या होत्या. त्याचबरोबर भीमा नदी पात्रात सोडलेले पाणी हिळ्ळी बंधाऱ्यापर्यंत पोहोचण्यासाठी ऐन उन्हाळ्यात दोन ते तीन वेळा वीजपुरवठा प्रत्येक वेळी १०-१२ दिवस बंद ठेवण्यात आला. यातून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. आता 'बैल गेला आणि झोपा केला' अशी जिल्हा प्रशासनाची स्थिती झाली आहे. कडक उन्हाळ्यात पिके वाळत असताना नदीपात्रात शिल्लक राहिलेले पाणी वाया घालवण्यासाठी दोन तास वीजपुरवठा केला जात आहे. उजनीतून सोडलेले पाणी कर्नाटकाच्या शेतकऱ्यांना पुरविण्याचा सोलापूर जिल्हा प्रशासनाचा डाव असल्याचा आरोपही रणदिवे यांनी केला.

यंदाच्या हंगामात उजनीच्या एका कालव्यात गरज नसताना १०० दिवसांपेक्षा जास्त दिवस पाणी सोडण्यात आले, असा आरोप करण्यात आला.

### शेतकऱ्यांचे पाणी एमआयडीसीला पळविल्याचा आरोप

सोडलेले पाणी कुठपर्यंत गेले हे पाहण्याची तसदीदेखील जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी घेतली नाही. त्यामुळे या कालव्यातून सोडलेले बहुतेक पाणी वाया गेले. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळवून एमआयडीसीला मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा करण्यात आला. हा पाणीपुरवठा गरजेपेक्षा जास्त प्रमाणात झाला. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी अन्यत्र वळवून तसेच चुकीच्या पद्धतीने, चुकीच्या वेळी नदीपात्रात पाणी सोडल्याचा फटका भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांना बसल्याचे रणदिवे यांनी निदर्शनास आणून दिले.

## आषाढी यात्रा सोहळा वारकऱ्यांच्या सोयीसुविधांसाठी ६१.५० कोटींचा निधी

**पंढरपूर :** आषाढी यात्रा सोहळा अवघा महिन्याभरावर येऊन ठेपला आहे. यासाठी मानाच्या पालख्या, दिंड्या, वारकऱ्यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारकडून तब्बल ६१ कोटी ५० लाखांच्या निधीची तरतूद केली आहे. सातारा, सोलापूर जिल्ह्यासाठी हा निधी उपलब्ध आहे. त्यामध्ये शौचालय, जर्मन हँगर, वॉटरप्रूफ मंडप, स्वच्छता, पाणीपुरवठ्यासह पालखी तळांवरील पायाभूत सुविधांसाठी खर्च होणार आहे.

राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत हा निधी मंजूर झाला आहे. या एकूण रकमेपैकी ३६ टक्के म्हणजेच २२ कोटी रूपयांपेक्षा जास्त निधी पहिल्या टप्प्यात वितरित झाला आहे. त्यामधून पालखी मार्ग, पालखी तळावर सध्या कामेही सुरू असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ५ मे २०२६ रोजी या निधीबाबत राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता.

वारकऱ्यांना सेवासुविधा पुरविण्यासाठी मुख्यमंत्री वारकरी सेवासुविधा केंद्रावर यावर्षी विशेष भर दिला आहे. या केंद्रांतर्गत उभारण्यात येणाऱ्या सुलभ शौचालयासाठी २० कोटी रूपयांचा निधी उपलब्ध केला आहे.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम जिल्हा सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील लोकांना या नोटीसीने कळविण्यात येते की, (१) डि. व सब डि. सोलापूरपैकी तालुका उत्तर सोलापूरपैकी मौजे खेड येथील ग्रामपंचायत हद्दीतील गट नंबर ५९/अ पूर्व मधील "रंगावती नगर" मधील प्लॉट नं.३७ यांसी क्षेत्र ००.९२.९४ आर. चौ. मी. इतके आहे. यासी चतु:सीमा :- पूर्वेस- प्लॉट नं. ४८, दक्षिणेस- प्लॉट नं.३६, पश्चिमेस- रस्ता, उत्तरेस- प्लॉट नं.३८ येणेप्रमाणे वर्णनाची खुली प्लॉट जागा. (२) कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत सौ. यशश्री प्रसाद खराटे यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. सदरची मिळकत आमचे अशिल संगीता रघुनाथ सुर्यवंशी यांनी खरेदी घेण्याचे ठरवून तसा तोंडी करार झालेला आहे. खरेदीची योग्य किंमत रक्कम ठरली असून, काही रक्कम इसारा रक्कम म्हणून दिली आहे. आमचे अशिल सदरची मिळकत खरेदी घेण्यास तयार आहेत. (३) वर कलम १ मधील मिळकत निर्वेध व निजोखमी असून ती कोणत्याही कोर्टाच्या अधिकार कक्षेचा भाग नाही अथवा सदर मिळकतीवरती अन्य कोणाचाही हक्क, हितसंबंध, दावा, लिज, गहाण, दान, बक्षीस, पोटगी, खरेदी-विक्री व इतर स्वरूपाचे करार अगर दस्त तसेच दस्तऐवज अशा कोणत्याही हक्क प्रस्थापित होईल अशा दस्ताने गुंतविलेली नाही अशी हमी व खात्री मिळकतीच्या मालकांनी दिली आहे. (४) तरी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ (आठ) दिवसाच्या आत आपली हरकत कागदोपत्री खालील नमूद पत्त्यावरती नोंदवावी. तसे न झाल्यास अगर मुदतीअंती सदरच्या मिळकतीबाबतचा खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. तदुनंतर कोणाचीही, कोणत्याही प्रकारची हरकत चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली तारीख- २२/०६/२०२६.

सही/– सागर संजय चवरे,
ॲडव्होकेट
रा. १३४, स्वराज्य विहार, बलदवा हॉस्पिटलच्या मागे, वसंत विहार, सोलापूर.
मो. नं. ९९२२१९१५३५.
अशिलातर्फे ॲडव्होकेट

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांना जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूरपैकी तालुका उत्तर सोलापूरपैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १३७/१ नवीन सर्व्हे नं. १३५/१ पैकी साई नगर- अे मधील प्लॉट नं. ९४ याचे क्षेत्र ६०० चौरस फूट व प्लॉट नं. ९६ याचे क्षेत्र ६०० चौरस फूट दोन्ही प्लॉटचे एकूण क्षेत्र १२०० चौरस फूट इतकी आहे. प्लॉट नं. ९४ यांसी चतु:सीमा– पूर्वेस :- प्लॉट नं. ९३, दक्षिणेस :- प्लॉट नं. ९६, पश्चिमेस :- रस्ता, उत्तरेस :- प्लॉट नं. ९२ व प्लॉट नं. ९६ यांसी चतु:सीमा– पूर्वेस :- प्लॉट नं. ९५, दक्षिणेस :- प्लॉट नं. ९८ पश्चिमेस :- रस्ता, उत्तरेस :- प्लॉट नं. ९४. वर नमूद दोन्ही प्लॉट जागा १) इश्तियाक अहमद म. युसुफ शेख, २) म. युसुफ अ. गनी शेख यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. त्यांनी सदर वर नमूद मिळकत आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून इसारा रक्कम स्विकारुन, आमचे अशिलांचे नावे इसारा पावतीचा दस्त लिहून दिला आहे. वर नमूद दोन्ही प्लॉट जागा मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, अशी मिळकत मालकांनी आमचे अशिलांना खात्री व भरवसा दिले आहे. तरी परंतु, वरील मिळकतीबाबत कोणाचा गहाण, दान, लिज, टाच, बक्षीस पत्र, साठे खत, खरेदी खत, कुलमुखत्यार पत्र, नोटरी करार-मदार, इसारा पावती, कब्जा साठे खत, पोटगी, कोर्ट केस, बँक कर्ज बोजा, तसेच सहकारी संस्था वगैरे कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाचे आत लेखी कागदपत्राचे पुराव्यानिशी खालील नमूद पत्त्यावर येवून आमचे अशिलाची खात्री करुन द्यावी. मुदतीत कुणाचीही तक्रार व हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मग तदुनंतर सदर वर नमूद मिळकतीबाबत व मालकीबाबत कुणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत व तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली असे. ता. २२/६/२०२६.

सही/– ॲड. नागेश एस. कोळी,
एम. ए., एलएल. एम.
३०१, भवानी पेठ, मराठा वस्ती, सोलापूर.
मो. नं. ७७७६९६०००१.
अशिलातर्फे ॲडव्होकेट.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूरातील तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, डि.।। व सब डि.।। सोलापूरपैकी ता. उत्तर सोलापूरपैकी शहर सोलापूर महानगरपालिका सोलापूर हद्दीतील तेलंगी पाच्छा पेठ येथील खालील नमूद मिळकती- १) सिटी सर्व्हे नंबर १०३८०/१०७ फायनल प्लॉट नंबर २४४, याचे एकूण क्षेत्र १७८.१ चौ.मी. यापैकी माझे खरेदी मालकीची उत्तरेकडील दिशेचे क्षेत्र ७४.५६ चौ. मी. म्यु. पल घर नंबर १०८, मिळकत नंबर १६०१७३ व १६७६२६ असा आहे. यांसी चतु:सीमा– पूर्वेस : रस्ता, पश्चिमेस : सि.स. नं. १०३८०/१०५ ची घर जागा, दक्षिणेस : सदर सि.स.नं. १०३८०/१०८, फा. प्लॉट नं. २४४ पैकी राहिलेली जागा, उत्तरेस :नाला. २) सिटी सर्व्हे नंबर १०३८० / १०७ याचे एकूण क्षेत्र १७८.१० चौ.मी. इतके आहेत. यापैकी दक्षिणेकडील बाजुचे क्षेत्र १०३.५४ चौ. मी. म्यु. पल घर नंबर १०८, मिळकत नंबर १६०१७३ असा आहे. सदर दोन्ही मिळकतीचे एकूण क्षेत्र १७८.१० चौ.मी. इतके होत असून यात ७५.८३ चौ.मी. क्षेत्रात बांधकाम आहे. तसेच सदर जागेत नळ, व लाईट इत्यादीची सोय आहे. विद्युत ग्राहक क्रमांक ३३०२४०२२८८४० व मिटर क्रमांक ०७६००२९८९६२ ने विद्युत पुरवठा चालु आहे. सदर तुम्हास वक्षीस केलेल्या क्षेत्रास जाणे येणेसाठी, वाहतुकीसाठी असलेल्या पूर्वापार वहीवाटी प्रमाणे रस्त्याचा वापर उपभोग तुम्ही घेत जाणेचा आहे. यांसी चतु:सीमा : पूर्वेस : रस्ता, पश्चिमेस : सि. स. नं. १०३८०/१०६, दक्षिणेस :बोळ, उत्तरेस : सदर सि. स. नं. पैकी. ३) सिटी सर्व्हे नंबर १०३८०/१०६ फायनल प्लॉट नंबर २४३, एकूण क्षेत्र २३६.६ चौ.मी. यापैकी माझे खरेदी मालकीची पूर्वेकडील दिशेचे क्षेत्र ८३.५५ चौ.मी. म्यु. पल घर नंबर १०७, मिळकत नंबर १६७१६९ असा आहे. सदर जागेत ५०.०९ चौ. मी. क्षेत्रात बांधकाम आहे. सदर जागेत नळ व नळाचे कनेक्शन, लाईट इत्यादीची सोय आहे. यांसी चतु:सीमा येणेप्रमाणे- पूर्वेस : वाकोडे व मादास यांची घरजागा, पश्चिमेस : मिस्कीन यांची घरजागा, दक्षिणेस : रस्ता, उत्तरेस : सरकारी नाला. अशा वर्णनाची वर नमूद मिळकत ही १) समीर जाकीर हुसेन पिरजादे, २) जमीर हुसैन जाकीर हुसैनी पिरजादे, ३) अमिर हुसेन जाकी हुसेन पिरजादे, सर्व रा. १८७बी, तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर यांच्या स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची असून सदरची मिळकत ही त्यांनी आमचे अशील १) मुआज अहमद म. सलीम पटेल, रा. ५९६, गरीबी हटाव झोपडपट्टी नं. २ अबुहनिफा मस्जीद जवळ, सोलापूर, २) मुसैब म. सलीम पटेल, रा. ५९६, गरीबी हटाव झोपडपट्टी नं. २, सोलापूर यांना कायम खुषखरेदी देण्याचे ठरवून त्यांच्याकडून इसारा रक्कम स्वीकारुन इसारा पावतीचा दस्त लिहून दिलेला आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची व ती त्यांनी यापूर्वी कोणासही विक्री, ट्रान्सफर, गहाण, दान, टाच, लिज अथवा अन्य मागाने गुंतविलेली नाही अशी हमी त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली आहे. तरी सदरहू मिळकतीवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, लिज, लिन, इजमेंट राईट, कोर्टाची टाच, वित्त संस्थेचा बोजा अगर इतर बँकेचा बोजा वगैरे काही असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर समक्ष भेटून आपल्या हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाची हिला हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तदुनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली तारीख २२/०६/२०२६.

सही/– ॲड. एस. वाय. आबाजी,
बी.एस.एल. एलएल.बी., नोटरी भारत सरकार
ॲड. ए. एस. आबाजी
बी. ए. एलएल.बी.,
१३० / १३ ते १५ए, सिध्देश्वर पेठ, सोलापूर
मो.नं. ९७३०५४६७५६ / ९४०३०४३७९३
१) मुआज अहमद म. सलीम पटेल २) मुसैब म. सलीम पटेल या अशिलातर्फे ॲडव्होकेट्स.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर येथील लोकास या खरेदीपूर्व जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूरपैकी तालुका दक्षिण सोलापूरपैकी मौजे कुंभारी येथील व सोलापूर जिल्हा परिषद हद्दीतील जागा यांसी गट नंबर ४९९/१ब पैकी परमेश्वर नगर या नावाने ओळखले जाणारे मधील प्लॉट नं. २३ आणि २४ यासी प्रत्येकी प्लॉटचे क्षेत्र ५५.७६ चौ. मीटर अथवा ६०० चौरस फूट इतके आहे. यासी एकत्रित चतु:सीमा येणेप्रमाणे : पूर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नंबर ३३ व ३४, दक्षिणेस : प्लॉट नंबर २२ व २३, उत्तरेस : प्लॉट नंबर २४ व २५ येणेप्रमाणे वर्णनाची दोन्ही प्लॉट जागा ही रविंद्र नारायण पोरंडला यांचे कुलमुखत्यारधारक म्हणून श्री. श्रीकांत रामचंद्र गुजर, रा. सोलापूर यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरहू प्लॉट जागा आमचे अशील सौ. कलावती लक्ष्मण इंगळे, रा. सोलापूर यांना विक्री करण्याचे ठरवून आमचे अशिलाकडून कांही रक्कम स्वीकारुन सदरहू जागेचे कब्जा पावतीचा व्यवहार झालेला आहे. तसेच सदरहू घर जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची ग्वाही त्यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि, ज्या कोणाचाही या घर जागेत करार, साठे खत, दान, गहाण, लिज, पोटगी, बक्षीस पत्र, बोजा, वाटणी पत्र, मृत्युपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस, लिज पेन्डन्सी या अथवा अन्य कोणत्याही मागाने हक्क अथवा हितसंबंध असतील त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ (आठ) दिवसांचे आत कागदोपत्री पुरावा देवून लेखी हरकत खालील नमूद पत्त्यावर द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशील सदरची घर जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याचे समजून पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तदुनंतर मात्र कोणाचीही, कसलीही तक्रार व हरकत चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे. ही जाहीर नोटीस दिली. ता. २२/०६/२०२६.

सही/– ॲड. एस. वाय. आबाजी
बी. एस. एल. एलएल. बी. नोटरी– भारत सरकार
ॲड. ए. एस. आबाजी
बी. ए. एलएल. बी.
130/13 ते 15 ए, सिध्देश्वर पेठ,
सोलापूर . मो. नं. 9403043793/9730546756.
अशिलातर्फे ॲडव्होकेट्स
अशील : सौ. कलावती लक्ष्मण इंगळे

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर येथील रहिवाशांना या जाहीर नोटिसीव्दारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि.।। व सब डि.।। सोलापूरपैकी तालुका उत्तर सोलापूरपैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील पेठ मुरारजी येथील मिळकत यासी टी. पी. स्कीम नं. ०४, फायनल प्लॉट नं./सि.स.नं. ८५३४/१०४/४१अ याचे क्षेत्र १५८.६० चौ. मी. येणेप्रमाणे वर नमूद केलेली मिळकत ही उल्हास पृथ्वीराज पंडीत, अरुणा पृथ्वीराज पंडीत, व उन्मेश पृथ्वीराज पंडीत यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. सदरहू मालकांनी सदरहू मिळकत आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरविले आहे. तसेच सदरहु मालकांनी सदरहू मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री आमचे अशिलांना दिली आहे. तरी परंतु, सदर मिळकतीवर अन्य कोणाचा हक्क, दावा, लिज, गहाण, दान, बक्षीस, पोटगी, खरेदी-विक्री व इतर स्वरुपाचे करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत आपले हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर आणून देऊन खात्री करुन द्यावी. जर मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहेत असे समजून आमचे अशिलांनी सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तदुनंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली ता. २२/०६/२०२६.

सही/– ॲड. बाळासाहेब त्रिंबक नवले,
ॲड. सौ. पद्मश्री बाळासाहेब नवले,
'मातोश्री',९१, मुरारजी पेठ,
सोलापूर-४१३००१. मो. नं. ९८८१४९९४५५.
अशिलातर्फे ॲडव्होकेट

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी, ता. बार्शी व आसपासचे लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शीपैकी शहर बार्शी हद्दीतील खुले प्लॉट जागेचे वर्णन याचा गट नं. ८५७ यामधील प्लॉट नं. ३७ याचे क्षेत्रफळ १४०.०० चौ. मी. यामधील पूर्व बाजूचा संपूर्ण प्लॉट याचे ७/१२ रेकॉर्डप्रमाणे क्षेत्रफळ ७०.०० चौ.मी. आहे. यांची मोजमापे पूर्व-पश्चिम फूट २१, दक्षिणोत्तर फूट ३६ यांसी चतु:सीमा– पूर्वेस– प्लॉट नं. ३८, दक्षिणेस– रस्ता, पश्चिमेस– सदर गट नं. पैकी प्लॉट नं. ३७ पैकी सुनिता उमराव जाधव यांचा प्लॉट, उत्तरेस– गट नं. ८५८ पैकी मिळकत आहे, यासी वागणूक, पाणी दक्षिण बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे प्लॉट आतील तदांभूत वस्तुसह. सदर प्लॉट गुंठेवारी बार्शी नगरपालिका येथील जा.क्र. स्थापत्य/२३७८ दि. ०२/०४/२०१६ रोजी नियमाधिन परवाना क्र. ७४/२००५ अन्वये नियमाधिन झालेले आहे. वर नमूद प्लॉट मिळकत ही महेश भगवान कोंडलकर, रा. भवानी पेठ, बार्शी, यांचे खरेदी मालकी व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची आहे. त्यानुसार वर नमूद मिळकतीचे ७/१२ चे हक्कपत्रकी मालक व कब्जेवहीवाट सदरी विद्यमान मालक यांची नोंद आहे. तसेच प्रत्यक्ष कब्जेत आहे. सदर मिळकत ही त्यांनी त्यांचे प्रापंचिक अडचणी, गरजा भागविण्यासाठी, दुसरी सोयीस्कर जागा घेणेसाठी विक्रीस काढली आहे. त्यानुसार वर नमूद मिळकत ही विद्यमान मालकांनी आमचे अशिलास खरेदी देणेचा तराव केला आहे, त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलास निर्वेध व निजोखमी असल्याचा निर्वाळा दिलेला आहे. याउपर वरील मिळकतीशी इतर कोणाचा खरेदी, साठे खत, गहाण, दान, लिज, बोजा, हक्क, हिस्सा, पोटगी, तारण, इजमेंटरी राईट व अन्य कोणत्याही, कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ दिवसाचे आत त्यांनी खालील नमूद पत्त्यावर संपर्क साधून त्याबाबत कागदपत्रानिशी शहानिशा करून द्यावी अथवा तक्रार वा लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाची तक्रार वा हरकत न आलेस आमचे अशील कोणाची काहीही हरकत अथवा तक्रार नाही असे समजून वरील मिळकतीबाबत ठरावाप्रमाणे वर नमूद मालकाशी खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर मागाहून कोणाचीही, कसल्याही प्रकारे तक्रार हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाची फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. ता. २२/०६/२०२६.

सही/– ॲड. काकासाहेब डी. गुंड (लाडोळेकर),
ॲड. अक्षय व्ही. कुरूंद
अशिलातर्फे ॲडव्होकेट्स
मो.नं. 9822999038.
खरेदीदारतर्फे ॲडव्होकेट्स

बँक ऑफ इंडिया
नातं बँकींग पलिकडचं...

**वसुली विभाग – सोलापूर आंचलिक कार्यालय**
सह्याद्री शॉपिंग सेंटर, जुना एम्प्लॉयमेंट चौक,
सोलापूर -४१३००१. फोन : ०२१७२-२३१९४७६
इमेल : Solapur.ARD@bankofindia.bank.in

रुल ८(६) आर/डब्ल्यु ९ (१)

**स्थावर मालमत्तेचा विक्री सुचना**

ई लिलाव द्वारे स्थावर मिळकतींची विक्री नोटीस : सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरीटी इन्टरेस्ट ॲक्ट २००२, सिक्युरीटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल २००२ मधील तरतुद कलम 8(6) R/W 9(1)

**ई लिलाव दिनांक व वेळ : दि.९ जुलै २०२६ स.११ ते सायं.५ पर्यंत (भारतीय प्रमाण वेळेनुसार)**

तमाम नागरिकांना, विशेषत: कर्जदार व जामीनदार यांना सुचना देण्यात येते कि कर्जदार/जामीनदार यांच्याकडुन येणे रक्कम बाकी पोटी बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी यांनी नमुद स्थावर मालमत्तेचा ताबा घेतला असुन सदर मालमत्तांचा ई-लिलाव द्वारे ''जेथे आहे तेथे, जसे आहे तसे, जेवढे आहे तेवढे '' या तत्वावर दि. ९ जलै २०२६ रोजी विक्रीस काढली आहे ज्याचा तपशील खालील प्रमाणे आहे

| अ. क्र. | प्रकार | जागेचे तपशिल | शाखा कर्जदाराचे/जामीनदाराचे नाव | मालमत्तेचे सविस्तर वर्णन | राखीव किंमत रु./ अनामत बयाणा रक्कम | एकुण येणे बाकी + व्याज + इतर खर्च | प्रोपर्टी इनस्पेक्शन तारीख/वेळ प्राधिकृत अधिकारी नांव व मोबाईल क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | फ्लॅट (प्रत्यक्ष ताबा) | होटगी रोड, सोलापूर-४१३४०४ | **होटगी रोड शाखा** श्री. विनीत मलय्या मठपती (कर्जदार) | फ्लॅट नं.५०३, पाचवा मजला, नवीन सर्व्हे नं.६/५बी, ६/६, ६/७/ए, ' जय प्लाझा ', चौगुले पार्क, युनरायटेड ग्रीन्स जवळ, होटगी रोड, सोलापूर-४१३००४ येथील श्री.विनीत मलय्या मठपती यांच्या मालकीची जागा व इतर साहित्य एकुण प्लॉट क्षेत्रफळ ५९.५७ स्क्वे.मी | रु.२१.३३ लाख इएमडी रु.२,१३,३००/- | रु.९९.८९ लाख + व्याज व इतर खर्च दि.२९.०१.२०२४ पासुन | तारीख : दि.०२/०७/२०२६ वेळ : स.११ ते दु. ४ पर्यंत श्री.संजीव कुमार श्रीवास्तवा (मुख्य प्रबंधक) फोन : 0217- 2600829; मो : 7903960760 hotgiroad.solapur@bankofindia.bank.in |
| ०२. | फ्लॅट (प्रत्यक्ष ताबा) | राघवेंद्र नगर, विजापूर रोड, सोलापूर-४१३००६ | **होटगी रोड शाखा** श्री. नेताजी अर्जुन नारायणकर (कर्जदार) सौ.सीमा नेताजी नारायणकर (सह-कर्जदार) | फ्लॅट नं.२०४, दुसरा मजला, ऋषी रेसीडेंसी, प्लॉट नं.२१२, जुना सर्व्हे नं.३४२, न्यु सर्व्हे नं.१०६ (भाग), राघवेंद्र नगर, विजापूर रोड-४१३००६ येथील श्री.नेताजी अर्जुन नारायणकर यांच्या मालकीची जागा व इतर साहित्य एकुण फ्लॉट क्षेत्रफळ ४०.७५ स्क्वे.मी | रु.१६.०८ लाख इएमडी रु.१,६०,८००/- | रु.१३.३९ लाख + व्याज व इतर खर्च दि.२७.०२.२०२३ पासुन | तारीख : दि.०२/०७/२०२६ वेळ : स.११ ते दु. ४ पर्यंत श्री.संजीव कुमार श्रीवास्तवा (मुख्य प्रबंधक) फोन : 0217- 2600829; मो : 7903960760 hotgiroad.solapur@bankofindia.bank.in |
| ०३. | फ्लॅट (प्रत्यक्ष ताबा) | पाच्छा पेठ, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर-४१३००३ | **सदर बझार शाखा शाखा** सौ.अश्विनी अप्पासाहेब आडके (कर्जदार) | फ्लॅट नं.२०१, दुसरा मजला, जयलक्ष्मी रेसीडेंसी-४, प्लॉट नं.३५, सब प्लॉट नं. १३४, सि.स.नं.१०३८९/ए, न्यु पाच्छा पेठ, ता.उत्तर सोलापूर-४१३००३ येथील सौ. अश्विनी अप्पासाहेब आडके यांच्या मालकीची जागा व इतर साहित्य एकुण प्लॉट क्षेत्रफळ ५०.७३ स्क्वे.मी | रु.१८.०३ लाख इएमडी रु.१,८०,३००/- | रु.२०.४२ लाख + व्याज व इतर खर्च दि.२९.०७.२०१९ पासुन | तारीख : दि.०२/०७/२०२६ वेळ : स.११ ते दु. ४ पर्यंत श्री.शांतप्पा सिध्दराम सलगरे (मुख